I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 363-368
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No.: MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# गडचिरोली जिल्हयातील पंचायतराज मधील सरपंचाच्या नेतृत्व व कार्याचे चिकित्सक अध्ययन (कालखंड २००५ ते २०१०)

आर. पी. करोडकर
शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली
*Corresponding Author: rakeshkarodkar638@gmail.com

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :-**

सदर संशोधनामध्ये अध्ययन विषय हा ग्रामीण स्वराज्य संस्थेशी निगडीत असल्यामुळे स्थानिक स्वशासन संस्थेवर विशेष भर देण्यात आला. भारतीय, सामाजिक व राष्ट्रीय जीवनाचा एक अविभाज्य घटक म्हणुन स्थानिक स्वशासन संस्थेचा पुरातन काळापासून स्विकार करण्यात आला आहे. लोकशाहीची मूल्ये नागरीकांपर्यंत पोहचण्यामध्ये स्थानिक स्वशासनाच्या महत्वाचा वाटा आहे. जनतेच्या सर्वांगिण विकासासाठी स्थानिक स्वशासन संस्था विशेष करुन ग्राम पंचायत संस्थांचा ग्रामीण विकासामध्ये महत्वाचा वाटा आहे. लोकशाही प्रधान देशामध्ये अनेक महत्वाची कार्य या संस्थांकडून केली जातात. सदर प्रकरणामध्ये विविध विचारवंताच्या स्थानिक स्वशासना बददलच्या व्याख्या स्पष्ट करण्यात आल्या आहेत. ज्यामुळे अध्ययनाला मजबूती आलेली आहे. या संस्थांमुळे ग्रामीण जीवनावर फार मोठे परिणाम होतात. यावर प्रकाश टाकलेला आला आहे. ७३ व्या घटना दुरुस्तीमुळे या संस्था लोकाभिमूख कशा झाल्या याची माहिती देण्यात आली असून ग्राम पंचायत व सरपंचाची ग्रामीण विकासातील भूमिका विशद करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रबंधात गडचिरोली जिल्हयातील सर्व तालुक्यातील ग्राम पंचायतीमधील महिला व पुरुष सरपंचांच्या २००५ ते २०१० या कार्यकाळातील नेतृत्वाचे व कार्याचे अध्ययन अंतर्भूत आहे. गडचिरोली जिल्हयात एकुण १२ तालुके असून ग्राम पंचायतीची एकुण संख्या ४६७ आहे. उपरोक्त ४६७ ग्राम पंचायतीपैकी ४२८ ग्राम पंचायतीमध्ये सरपंच पद कार्यरत असुन त्यापैकी १४० ठिकाणी महिला सरपंच व २८८ ठिकाणी पुरुष सरपंच आहेत. असे एकुण ४२८ सरपंचाचे नेतृत्व ग्राम पंचायतीवर लाभले आहे. गडचिरोली जिल्हयातील चामोर्शी, अहेरी, भामरागड, आरमोरी, सिरोंचा, मुलचेरा, गडचिरोली, देसाईगंज, कोरची, धानोरा, कुरखेडा, एटापल्ली इत्यादी तालुक्यातील स्थानिक स्वशासनात कार्य करणाऱ्या सरपंचाच्या नेतृत्वाचे व कार्याचे चिकित्सक अध्ययन करुन निष्कर्षा प्रत पोहोचणे हा उदेश अध्ययन व संशोधनाचा आहे.

**बीजसंज्ञा :-** गडचिरोली जिल्हा, पंचायतराज, सरपंच, नेतृत्व व कार्य, ग्रामीण विकासावर परिणाम.

## प्रस्तावना :-

सदर प्रकरणामध्ये विषयाची प्रस्तावना व अध्ययनाचे स्वरुप करण्यात आले आहे. अध्ययन विषय हा ग्रामीण स्वराज्य संस्थेशी निगडीत असल्यामुळे स्थानिक स्वशासन संस्थेवर विशेष भर देण्यात आला. भारतीय, सामाजिक व राष्ट्रीय जीवनाचा एक अविभाज्य घटक म्हणुन स्थानिक स्वशासन संस्थेचा पुरातन काळापासून स्विकार करण्यात आला आहे. लोकशाहीची मूल्ये नागरीकांपर्यंत पोहचण्यामध्ये स्थानिक स्वशासनाच्या महत्वाचा वाटा आहे. जनतेच्या सर्वांगिण विकासासाठी स्थानिक स्वशासन संस्था विशेष करुन ग्राम पंचायत संस्थांचा ग्रामीण विकासामध्ये महत्वाचा वाटा आहे. लोकशाही प्रधान देशामध्ये अनेक महत्वाची कार्य या संस्थांकडून केली जातात. सदर प्रकरणामध्ये विविध विचारवंताच्या स्थानिक स्वशासना बददलच्या व्याख्या स्पष्ट करण्यात आल्या आहेत. ज्यामुळे अध्ययनाला मजबूती आलेली आहे. या संस्थांमुळे ग्रामीण जीवनावर फार मोठे परिणाम होतात. यावर प्रकाश टाकलेला आला आहे. ७३ व्या घटना

दुरुस्तीमुळे या संस्था लोकाभिमूख कशा झाल्या याची माहिती देण्यात आली असून ग्राम पंचायत व सरपंचाची ग्रामीण विकासातील भूमिका विशद करण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणामध्ये अध्ययन क्षेत्र असलेल्या गडचिरोली जिल्हयाची संक्षिप्त माहिती दिलेली आहे. तसेच अध्ययन क्षेत्रातील विस्तृत माहिती समोरच्या प्रकरणात घेण्यात आलेली आहे. प्रस्तुत संशोधनाकरीता वापरण्यात आलेल्या पध्दतीचे विवेचन याच प्रकरणात घेण्यात आलेले आहे.

**संशोधन पध्दती —**

संशोधन हा ज्ञानाचा अविभाज्य घटक आहे. संशोधनामध्ये १०० टक्के अचुकता आणता येत नसली तरी समाजाचे स्वरुप व कार्यपध्दती जाणून घेण्याच्या गरजेतुन संषोधन हे केले जातात, म्हणून संषोधन पध्दती महत्वाची ठरते. वैज्ञानिक पध्दतीने केलेले संषोधन हे महत्वाचे मानले जाते. सामाजिक संषोधन हे जीवनाच्या विविध पैलुंचा शोध घेणारी वैज्ञानिक प्रकिया आहे. प्रस्तुत संषोधनात वैज्ञानिक व शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. अध्ययनासाठी संषोधन आराखडा हा महत्वाचा भाग समजला जातो म्हणुन प्रस्तुत विषयाच्या संषोधनासाठी वर्णनात्मक संषोधन आराखडयाचा वापर करण्यात आलेला आहे.

**अध्ययन समग्राची निश्चिती —**

७३ व्या घटना दुरुस्तीमुळे ग्रामीण स्तरावर झालेल्या महिला व पुरुषांचा राजकीय सहभाग पंचायत राज धोरणाच्या उद्दिष्ट पूर्तीच्या दृष्टीने कितपत प्रभावी आहे याची पडताळणी करण्यासाठी समग्राची निश्चिती करणे महत्वाचे ठरते. अध्ययन क्षेत्रामध्ये गडचिरोली जिल्हयामधील १२ तालुक्यातील ४६७ ग्रामपंचायती पैकी ४२८ ग्राम पंचायतीमधील महिला व पुरुष सरपंच समाविष्ट आहेत. ज्यामध्ये १४० महिला सरपंच आहेत व २२८ पुरुष सरपंच आहेत.

**नमुना निवड —**

नमुना निवडीकरीता जनगणना पध्दती व नमुना पध्दती या दोन्ही पध्दतींचा वापर करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनाकरीता गडचिरोली जिल्हयातील ग्राम पंचायतीमधील महिला व पुरुष सरपंच लोकप्रतिनिधी यांची समग्रातुन नमुना निवड करण्यात आलेली आहे. ग्रामपंचायतीकरीता नमुना पध्दतीतील संभाव्यता निवड प्रकरणातील साधा यादृच्छिक नमुना या पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन —**

प्रस्तुत संशोधनातील तथ्य संकलनासाठी स्त्रोत म्हणून प्राथमिक तथ्यांचा वापर करण्यात आला आहे. गडचिरोली जिल्हयातील स्थानिक स्वशासनामधील ग्राम पंचायत स्तरावरील महिला व पुरुष सरपंच लोकप्रतिनिधींकडुन मुलाखत अनुसूचीव्दारे प्रत्यक्ष माहिती भरुन घेण्यात आली आहे. सरपंच लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वाचा आढावा घेण्यासाठी मुलाखत अनुसूचीमधील पहिल्या भागात परिचयात्मक माहिती, दुसऱ्या भागात नेतृत्वाशी संबंधित संशोधनात्मक माहितीपर प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी ग्रामस्थ चर्चा, सभेतील चर्चा, निरीक्षण नोंदी,

मान्यवरांच्या प्रतिक्रिया, ग्रामसभा यांचा उपयोग करुन पुरक माहिती संकलित करण्यात आली आहे.

**संशोधनाची उदिदष्टये**

१. ग्राम पंचायतीचे प्रमुख पदाधिकारी अर्थात सरपंच आपल्या कर्तव्याबाबत व जबाबदाऱ्याबाबत ग्राम विकासाच्या दृष्टीने कितपत जागृत आहेत याचा अभ्यास करणे.

२. गावाच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने सरपंचाच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करणे.

३. स्थानिक स्वशासनाला ग्राम विकासाच्या आड येणाऱ्या मुख्य अडचणींचा अभ्यास करणे.

४. ग्राम विकास कार्यक्रमामध्ये ग्रामस्थ महिला सरपंचाच्या कार्याचा व सहभागाचा अभ्यास करणे.

५. शासकीय योजनांच्या ग्रामस्थांना लाभ मिळवून देणाऱ्या सरपंचाच्या कार्यपध्दतीचा व नेतृत्वाचा अभ्यास करणे.

६. ग्रामीण भागातील विधायक प्रवृत्तीस प्रोत्साहन व विघातक प्रवृत्तींना आळा याबाबत सरपंचाच्या योजनांचा अभ्यास करणे.

७. ग्रामस्थाशी समन्वय साधून गावामध्ये लोकोपयोगी व विकासात्मक राबविणाऱ्या सरपंचाच्या कार्याचे व नेतृत्वाचे अध्ययन करणे.

**गृहितकृत्ये**

गडचिरोली जिल्हयातील स्थानिक स्वशासनात सरपंचाची भुमिका, ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे मिळालेले प्रतिनिधीत्व व त्यांचे कार्य ग्रामविकासाच्या संदर्भात पाहिजे तेवढे समाधानकारक नाही.

१. स्थानिक स्वशासनात सरपंचाच्या नेतृत्वात आणि कार्यात राजकीय पक्षाच्या दबावाने अडचणी उत्पन्न होतांना दिसतात.

२. शिक्षण व अनुभव या दोन्ही घटकांचा सरपंचाच्या कार्यप्रणालीवर परिणाम होत असतांना दिसतो.

३. स्थानिक स्वशासनात महत्वाचे पद भुषविणारे सरपंच आपल्या कर्तव्य आणि जबाबदारीबाबत फारसे जागृत नाही.

४. कल्याणकारी योजना ग्रामस्थांना मिळवून देण्यात स्त्री व पुरुष सरपंच असमर्थ ठरत आहे.

५. स्त्री—पुरुष सरपंचाच्या प्रतिनिधीत्वात विशेष म्हणजे नेतृत्वाच्या गुणाचा अभाव दिसतो. स्वयंनिर्णय घेण्यात ते कमी पडत आहे.

६. स्त्री—पुरुष असलेल्या ग्रामपंचायतीला ग्रामविकासात अनेक अडचणी निर्माण होतात.

७. बहुतांश सरपंच शैक्षणिकदृष्टया मागास असल्याने व राजकीय कौशल्याचा अभाव असल्याने सक्षम नेतृत्व तयार होण्यास अडचणी उत्पन्न होतांना दिसतात.

८. स्थानिक स्वशासनात कार्य करतांना सरपंचाचा मुख्य अडसर प्रशासनाचा असल्याचे आढळुन येते.

**गडचिरोली जिल्हयातील पंचायतराज आणि सरपंचांचा सहभाग —**

संशोधन विषयाच्या प्रस्तुत प्रकरणात स्थानिक स्वशासन संस्थेचे महत्व विशद करण्यात आले आहे. तसेच विविध लेखकांच्या व्याख्या,

त्याचप्रमाणे स्थानिक स्वशासन संस्थांचे वैशिष्टये स्पष्ट करण्यात आले आहेत.

सदर प्रकरणामध्ये लोकशाही विकेंद्रीकरणाचा आढावा घेण्यात आला आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील पंचायतराज व घटनात्मक दर्जा संदर्भात विषयाला अनुकुल अशी माहिती सादर करण्यात आली आहे. पंचायतराज संस्थांना बळकटी आणण्यात योगदान देणाऱ्या विविध शिफारशींचा समावेश सदर प्रकरणात करण्यात आलेला आहे.

पंचायतराज संस्थांना बळकटी प्राप्त करुन देणाऱ्या ७३ व्या घटना दुरुस्तीचे महत्व नोंदविणाऱ्या बाबी सदर प्रकरणात समाविष्ट आहे. प्रस्तुत अध्ययन हे ग्राम पंचायतीमधील सरपंचांच्या नेतृत्वावर आधारीत असल्यामुळे ग्रामसभा व सरपंचांची भूमिका या विषयी विस्तृत माहिती देण्यात आली आहे. ग्राम सभेचे अधिकार त्याचबरोबर ग्राम सभेचे गतकालीन कार्यप्रणालीचे मुल्यांकन यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

ग्राम पंचायत स्तरावरील सरपंचांचे नेतृत्व तपासण्यासाठी त्यांच्या विविधांगी अधिकारांची व भूमिकांची माहिती देण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणात सरपंचांच्या स्थानिक स्वशासनातील सहभाग महत्वाचा असल्याने त्यांच्या सहभागाचे विश्लेषण मुलाखत अनुसूचीव्दारे करण्यात आलेले आहे.

गडचिरोली जिल्हयातील ग्रामपंचायत स्तरावर पुरुष सरपंचाचे प्रमाणे ६६.६७ टक्के असून महिला सरपंचाचे प्रमाण ३३.३३ टक्के आहे. ३३ टक्के आरक्षणामुळे ग्रामीण भागातील स्त्रियांना नेतृत्वाची संधी प्राप्त झाली. मात्र त्यांचे नेतृत्व प्रभावहीन असल्याचे आढळुन येते. मात्र आरक्षणाच्या माध्यमातुन परंपरेच्या सीमेबाहेर पडण्याची त्यांना संधी मिळाली हे पंचायतराज व्यवस्थेच्या धोरणाचे मोठे यश मानले जाते. ३३ टक्के महिलांच्या आरक्षण हे ग्रामीण समुदायासाठी राजकीय सहभाग व कार्य करण्याची संधी उपलब्ध करुन देत असली तरी या आरक्षणाचा फायदा ग्रामीण सामूदायीक नेतृत्व बळकटीसाठी झाला नसल्याचे स्पष्ट होते. या ग्रामीण भागातील नेतृत्वात राखीव मानसिकतेचा अधिक प्रभाव असल्याचे स्पष्ट होते.

गडचिरोली जिल्हयातील स्थानिक स्वशासनामधील ग्राम पंचायत स्तरावर समाजातील अनेक प्रवर्गांना नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाली. मात्र निवडणूका व संविधानिक तरतूदी याचा तो परिणाम असल्याचे आढळते. समाताधिष्ठित नेतृत्व तयार करण्याची क्षमता स्थानिक स्वशासनाच्या रचनेत आहे. मात्र ही रचना सजवित असतांना परंपरेने कमकुवत लाभलेल्या ग्रामीण समाजाच्या दुर्बलतेकडे पाहण्याचा दृष्टीकोन राजकीय पक्षाचा बदलला नसल्याने ग्रामीण भागातील नेतृत्व विकसित व्हावे असे कोणत्याच पक्षांना वाटत नसल्याचे आढळुन आले. सरपंच लोकप्रतिनिधींच्या पाठील्यांने सत्ता प्रस्थापित करायची. मात्र त्यांना सत्तेत वाटा न देता गृहीत धरण्याच्या पक्षाच्या धोरणात बदल करण्याचे धाडस जिल्हयातील कोणत्याही

पक्षाने दाखविले नसल्याचे सरपंचाचे नेतृत्व जिल्हयात विकसित होवू शकले नाही.

**गडचिरोली जिल्हयातील सरपंचाच्या कार्याचे व नेतृत्वाचे विश्लेषण —**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनात्मक माहितींच्या माध्यमातून विचारलेल्या प्रश्नावरुन तथ्य संकलीत करण्यात आले व त्याचे विश्लेषण व निर्वचन करण्यात आले आहे.

या प्रकरणात सरपंचाच्या विविध पातळीवरील नेतृत्वाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. स्थानिक स्वशासनामध्ये सामान्य लोकांनाही प्रतिनिधीत्वाची संधी मिळत असल्याने विविधांगी राजकीय नेतृत्व विकसित होण्यास मदत झाली आहे किंवा नाही याबाबत सरपंच लोकप्रतिनिधींना काय वाटते याची माहिती देण्यात आलेली आहे.

स्थानिक स्वशासन संस्थामधील ग्राम पंचायत स्तरावर नेतृत्व करीत असतांना सरपंच लोकप्रतिनिधींना आलेल्या अडचणी, प्रशासनाचा अनुभव, पक्षाचा दबाव, इतर नेतृत्वाचा परिणाम बदलणाऱ्या परिस्थितीचा परिणाम इत्यादी घटकाबाबत लोकप्रतिनिधींना काय वाटते, या संदर्भातील त्यांच्या भूमिकांचा परामर्श घेण्यात आलेला आहे.

ग्रामीण स्वशासन स्तरावरील त्यांनी केलेल्या कामाचा आढावा, कार्य करीत असतांना आदिवासी बहुल भाग असलेल्या गडचिरोली जिल्हयात होणारा नक्षलवादी संघटनांचा अडसर याबाबत सरपंच लोकप्रतिनिधींची भूमिका तपासण्यात आलेली आहे. गडचिरोली जिल्हयातील ग्रामीण क्षेत्रातील शैक्षणिक स्थितीबाबत, त्याचप्रमाणे गावाच्या सामुदायिक विकासात शिक्षणाचे योगदान, सरपंच म्हणून पंचायतराज धोरणाची उपयुक्तता तसेच माहितीचा अधिकार व त्याची उपयोगिता इत्यादीबाबत अध्ययन क्षेत्रातील सरपंच लोकप्रतिनिधींच्या भूमिका, त्यांचे कार्य व नेतृत्वाचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**प्रमुख निष्कर्ष**

**गडचिरोली जिल्हयातील स्थानिक स्वशासनामधील सरपंचांच्या कार्याचे व नेतृत्वाचे चिकित्सक अध्ययन कालखंड २००५—२०१०** या विषयाच्या संशोधनाव्दारा प्राप्त झालेले काही प्रमुख निष्कर्ष पूढीलप्रमाणे आहेत.

१. स्थानिक स्वशासन स्तरावर सरपंचांच्या सक्षम नेतृत्व निर्मितीचा पंचायत राजचा उदेश्य पूर्णपणे सफल झाला नाही.

२. शिक्षण आणि अनुभव या दोन्ही घटकांची कमतरता असल्याचे सरपंचांचे कार्य व नेतृत्व प्रभावी ठरले नाही.

३. ग्रामीण भागामध्ये महिला सरपंचांचे राजकीय नेतृत्व विकसीत झाले नाही. मात्र सबलीकरणाची प्रक्रिया काही प्रमाणात सुरु झाली.

४. स्थानिक स्वशासनात महत्वाचे पद भूषविणारे सरपंच आपल्या कर्तव्य आणि जबाबदारीबाबत फारसे जागृत आढळुन आले नाही.

५. ग्रामीण विकासाच्या मार्गात प्रशासनाचा मुख्य अडसर असल्याने नेतृत्वावर विपरीत परिणाम झालेला आहे. सरपंचाचे नेतृत्व विकासभिमूख आढळुन आले नाही.

६.स्थानिक स्वशासन संस्थामधील सहभाग मोठया प्रमाणात असला तरी आर्थिक, शैक्षणिक व राजकीय कौशल्याचा अभाव असल्याने सक्षम नेतृत्व तयार होण्यास अडचणी निर्माण झाल्या आहे.

७.सरपंच लोकप्रतिनिधींच्या कार्यात स्वयंगती आढळुन येत नसल्यामुळे त्यांचे नेतृत्व व कार्य निरंतर आढळून येत नाही.

८.ग्रामीण व पारंपारीक माणसिकतेच्या गर्तेतुन न निघाल्याने सरपंच असलेल्या लोक प्रतिनिधींच्या नेतृत्वावर परिणाम पडल्याचे आढळते.

९.गडचिरोली जिल्हयातील आदिवासी व इतर सरपंच पुरुष व महिला लोकप्रतिनिधीचे प्रमाण घटनात्मक तरतुदी प्रमाणेच आढळते.

१०. स्थानिक स्वशासन संस्थेतील ग्राम पंचायतचे नेतृत्व करणारे सरपंच हे सक्षम लोकप्रतिनिधी म्हणून असमर्थ ठरले असून पंचायती राज संस्थांचा उद्येश सफल झाला नाही व त्यांचे नेतृत्व प्रभावी ठरले नाही.

११. ग्रामीण स्वशासन संस्थेत ग्राम पंचायत स्तरावर नेतृत्व निर्मितीची प्रक्रिया संथपणे सुरु आहे.

१२. ग्रामसभा, आमसभेतील अनास्थेमुळे सरपंच लोकप्रतिनिधींचे नेतृत्व प्रभावी ठरत नसल्याचे आढळते.

१३. महिला सरपंचाच्या नेतृत्व कार्यात धडाडी, संघर्ष, अभ्यासुपणा नसल्याने शासन स्तरावर त्यांच्या नेतृत्वाची दखल घेतल्या जात नाही. राजकीय पक्ष आपला वापर करतात असे स्त्री—पुरुष सरपंच असलेले लोकप्रतिनिधींचे मत आढळते त्यामुळे त्यांच्या नेतृत्वात स्वयंगती आढळत नाही.

**संदर्भ :–**

बंग के. आर. 'भारतातील स्थानिक स्वशासन' विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य मंगेश प्रकाशन नागपुर, प्र.आ. २००५, पृष्ठ कं. ४२, ४३

गारे गोविंद, 'महाराष्ट्रातील आदिवासी जमात' कॉन्टीनेंन्टल प्रकाशन पुणे,

पळसीकर रेखा, देवळांनकर शैलेंद्र, स्वतंत्र भारतातील राजकिय विचार प्रणाली, प्रकाशक डॉ. राजेंद्र वडनेरे, प्रभारी कुलसचिव, य.च.म.मु.वि. नाशिक, जुन २००९ पृ.क्र.८०

डोंगरे, 'वेध नक्षलवादी चळवळीचा', भारतीय श्रमशोध मंडळ, नातुबाग, नागपुर. १९९८, पृष्ठ कं. १

गरे गोविंद, 'नक्षलवाद आणि आदिवासी', सुगावा प्रकाशन पुणे, प्र.आ. २००३, पृष्ठ क्र. २३

लोटे रा.ज., भारतातील स्थानिक प्रशासन, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, प्र.आ. २०१२, पृष्ठ क्र. १६३, १६४

पाटील व्ही.बी. 'महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था', के. सागर पब्लिकेशन पुणे, २००५ पृष्ठ क्र. २०२.